IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN 2455-4375

# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची प्रेरणा

**डॉ. विनोद राऊत**
सहयोगी प्राध्यापक,
मराठी विभाग,
कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर.
९८९०३१३१५७
neelvin16@gmail.com

**सारांश :—**

धम्मक्रांतिनंतरची अभूतपूर्व घटना म्हणजे दलित—आंबेडकरवादी साहित्यप्रवाहाचा उदय होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उर्जामयी विचार घेऊन लिहिणाऱ्या आंबेडकरी प्रज्ञा प्रतिभांनी एकूणच मराठी साहित्याचे क्षितीच विस्तारत नेण्याचे कार्य केले आहे. मानवी जीवनाला नवा अर्थ देणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या विचारभूमीतून परिवर्तनाचा वसा घेत आपली अभिव्यक्ती साकारणाऱ्या आंबेडकरवादी कवींसोबत आंबेडकरवादी कवयित्रींची कविताही अधिक ठसठशीत, समृद्ध व परिपक्वतेने अभिव्यक्त होत गेली आहे. पुरूषांच्या अनुभूती व अनुभवविश्वापेक्षा स्त्रीचे अनुभवविश्व वैविध्यपूर्ण असते. या अनुभवविश्वाचेच कितीतरी आगळे पदर आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेत दिसतात. पारंपरिक भावलेखन करणाऱ्या मराठी कवयित्रींपेक्षा आंबेडकरवादी कवयित्रींच्या जाणिवांचे आकाश वेगळे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या युगद्रष्ट्या व्यक्तिमत्त्वामुळेच आपल्या आयुष्याला सुंदर अर्थ प्राप्त झाला याची प्रचिती आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता वाचल्या की येते. म्हणूनच आंबेडकरवादी कवयित्रींच्या प्रेरणा म्हणजे वेदना, विद्रोह व ज्ञानाच्या विशाल महासागर ठरलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे अवघे आयुष्य होय, हे सिद्ध होते.

**प्रस्तावना :—**

जीवनाची रसरशीत अभिव्यक्ती साकारणारा वाङ्मय प्रकार म्हणजे कविता अवघ्या मराठी कवितेत अत्यंत महत्त्वाची कविता म्हणून आंबेडकरवादी कवितेचा विचार करावा लागतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्रोहाचे रसायन आहे; मानवमुक्तीचे तत्त्वज्ञान आहे. ह्या तत्त्वज्ञानाने धम्मक्रांतिनंतर अनेक पिढ्या संस्कारित झाल्यात. कालपर्यंत मोकळे न होऊ शकणारे स्वर धम्मक्रांतिनंतर उत्स्फूर्तपणे गाऊ लागले. वाट्याला आलेली व्यथा—वेदना सांगू लागले. हजारो वर्षांच्या दलितत्त्वाच्या वेदनेतून आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रेरणेतून आंबेडकरवादी कवितेचा जन्म झाला. एक अनोखे जीवनदर्शन आंबेडकरवादी कवितेने मराठी वाचकांसमोर ठेवले. विद्रोह, वेदना आणि प्रस्थापितांच्या साहित्यमूल्यांना नकार देत आंबेडकरवादी कविता मराठी कवितेत आशयाभिव्यक्तीच्या सिंहासनावर विराजमान झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतदर्शी तत्त्वज्ञानाने फुललेल्या आंबेडकरवादी कवींच्या कवितेसोबतच आंबेडकरवादी कवयित्रींची कविताही समृद्धपणे अभिव्यक्त झाली आहे. आंबेडकरी कवींच्या तुलनेत सुरूवातीला काहीशी दुर्लक्षित राहिलेली पण आशय—अभिव्यक्तीचे नवे आणि धारदार शस्त्र होत, जीवनाच्या अनेक अंगांना कवेत घेत निर्माण होत गेलेली आंबेडकरवादी कवयित्रींची कविता एकूणच मराठी कवितेत दमदारपणे वाटचाल करते आहे. सुगंधा शेंडे, हिरा बनसोडे, सुरेखा भगत, कुमुद पावडे, ज्योती

लांजेवार, प्रज्ञा दया पवार, प्रतिभा राजानंद, सरला ठमके, ज्योत्सना चांदगुडे, आशा थोरात, आशालता कांबळे, सिसिलिया कार्व्हालो, प्रतिभा अहिरे, निलांबरी शिर्के, संध्या रंगारी, उषा अंभोरे, उषाकिरण आत्राम, कुसुम अलाम, कुसुम गांगुर्डे, हिरा पवार, संजीवनी राजगुरू, छाया कोरगावकर, शारदा नवले, लता इंगळे, शामल गरूड, अभिनया रमेश, दीपा राजवर्धने, वर्षा मारूती भिसे या आणि अशा कितीतरी पहिल्या व दुसऱ्या पिढीतील आंबेडकरवादी कवयित्रींनी आंबेडकरवादी कवितेला नवे आयाम प्राप्त करून दिले आहेत..

प्रस्तुत शोधनिबंधातून त्यांच्या कवितांमधील आंबेडकरी प्रेरणेचा विचार करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**मराठी साहित्य, आंबेडकरवाद आणि आंबेडकरी कवयित्रींची कविता :—**

अवघ्या मानवी जगण्याचे, संवेदनांचे प्रतिबिंब ज्यात उमटते तो सर्जनाच्या आणि सृजनाच्या पातळीवरचा महत्त्वाचा कलाविष्कार म्हणजे साहित्य होय. साहित्य माणसाला जगवते आणि जागवते देखील मराठी साहित्य या संज्ञने ११ व्या शतकापासून निर्मित होत गेलेले मराठी साहित्य कायम माणसाच्या जगण्याचा आधार झालेले दिसून येते. प्राचीन आणि मध्ययुगीन साहित्यापासून तर अर्वाचीन — आधुनिक — समकालीन — साठोत्तरी — नव्वदोत्तरी साहित्यार्यंत आणि त्यापुढेही कितीतरी मने या मराठी साहित्यातून व्यक्त होत गेलीत. माणसाच्या वेदना —संवेदनांचा अर्थ शब्दबद्ध करू पाहणाऱ्या मराठी साहित्याला खरा अर्थ आला तो १९६० नंतरच ज्या विशिष्ट व मध्यमवर्गीय जीवनजाणिवांपुरते मराठी साहित्य मर्यादित होते त्या साहित्यात १९६० च्या आसपास अनेक नवे साहित्यप्रवाह उदयास आलेत. ह्या साहित्यप्रवाहांमागे एक वैचारिक प्रेरणा होती. क्रांतदर्शी तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान होते. दलित साहित्य हा त्यापैकीच एक महत्त्वाचा प्रवाह. सुरूवातीला दलित साहित्य असे नामाभिधान धारण करणाऱ्या या साहित्याने अनेक अज्ञात प्रज्ञा —प्रतिभांना पुढे आणले. दलित साहित्यामागची प्रेरणा निश्चितच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हीच होती. म्हणूनच आंबेडकरवादी विचारसरणीला मानणाऱ्या प्रज्ञा —प्रतिभावंतांनी कालौघात दलित साहित्याला आंबेडकरवादी साहित्य असे सार्थ नाव दिले. दलित ते आंबेडकरवादी असा वेदना — विद्रोह — विचारांचा प्रवास करत आंबेडकरवादी साहित्य एका वैशिष्ट्यपूर्ण टप्प्यावर येऊन पोहचले आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचार प्रेरणेतूनच आंबेडकरवादी वाङ्मयीन जाणिवांचा उदय झाला आहे. धम्मक्रांतिनंतर अनेक आंबेडकरी प्रतिभा उन्मुक्तपणे आपला आविष्कार करू लागल्या. त्यांच्या कवितेतून रसरसणाऱ्या जातीवंत विद्रोहामागची प्रेरणा निश्चितच डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचे विद्यापीठ होते. म्हणूनच आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांमधील आंबेडकरी प्रेरणा शोधताना अगोदर आंबेडकरवाद म्हणजे काय हे समजून घ्यावे लागेल.

**आंबेडकरवाद म्हणजे काय? :—**

आंबेडकरवाद म्हणजे दास्य आणि मानवमुक्तीचा जाहीरनामा. आंबेडकरवाद म्हणजे समतेचे तत्त्वज्ञान. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या संबंध लेखनातून मांडलेला मानवीहिताचा विचार म्हणजे आंबेडकरवाद. धर्माकडून धम्माकडे होणारा प्रवास म्हणजे आंबेडकरवाद. सर्व प्रकारच्या शोषणसत्तांविरूद्धचा बुलंद आवाज म्हणजे आंबेडकरवाद. आंबेडकरवाद एक मौलिक तत्त्वज्ञान आहे. कुठलीही विषमता नसलेल्या समतावादी जीवनाचा ते पुरस्कार करते. जीवनाच्या सर्वच पातळ्यांवर अरूप वाट्याला आलेल्या मानवी जीवनाला सुंदर अर्थ प्रदान करण्याचे कार्य आंबेडकरवाद करते.

इहवादी विचारधारेचे पाईक व बुद्धीवादी समीक्षक म्हणून प्रसिद्ध असलेल्या डॉ. यशवंत मनोहरांनी त्यांच्या 'आंबेडकरवादी मराठी साहित्य' या ग्रंथात आंबेडकरवादाची सुंदर आणि अर्थपूर्ण मीमांसा केली आहे. या ग्रंथात ते एके ठिकाणी म्हणतात, "भाकरीच्या नावाने होणारी बंडे न्यायाच्या प्रस्थापनेसाठी होत असतात त्याप्रकारे आंबेडकरवाद विशिष्ट स्थलकालातील शोषणांच्या निमित्ताने निर्माण झाला असला तरी त्याची सिद्धी न्यायाच्या प्रस्थापनेसाठीच झालेली आहे. निमित्ते उलंघिण्याची आणि 'अन्याय' या वस्तुस्थितीचे उत्तर देण्याची, अन्याय या वस्तुस्थितीचे 'न्याय' या वस्तुस्थितीत रूपांतर करण्याची प्रभावी, विश्वासार्ह पद्धती असे आंबेडकरवादाचे स्वरूप आहे."[१] आंबेडकरवादाची आणखी मूलभूत चिकित्सा करताना यशवंत मनोहर याच ग्रंथात पुढे लिहितात, "आंबेडकरवादी जीवनदृष्टी म्हणजे आंबेडकरवादी जीवनाभिरूची! आंबेडकरवाद ही एक संपूर्ण जीवनाभिरूचीच आहे. जीवनातील इष्टानिष्टाचा निवाडा रेखीवपणे करण्याची ताकद या जीवनाभिरूचीत आहे. या जीवनाभिरूचीतूनच उगवू शकेल, तिच्याशी सुसंगत ठरेल अशी वाङ्मयदृष्टी ही आंबेडकरवादाजवळ आहे. ही वाङ्मयाभिरूची प्रतिक्रांतीवादी दृष्टीकोन स्वीकारूच शकत नाही आणि आंबेडकरवादी जीवनाभिरूची विषमतेच्या राखणदारांनाही स्वीकारूच शकत नाहीत. मनोरंजनवादी साहित्य आंबेडकरवादाला मान्य नाही."[२] मनोहरांच्या या सिद्धांतवादी विवेचनातून आंबेडकरवादाचे स्वरूप स्पष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही उर्जा आहे. प्रकाशाचा स्त्रोत आहे. माणसाला माणूसपण बहाल करणारा समतावादी विचार आहे. डॉ. आंबेडकर ही युगप्रेरणा आहे. डॉ. आंबेडकरांची प्रेरणा घेऊनच आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता मराठी साहित्यविश्वात दाखल झाली. मनोरंजनवादी साहित्याला नकार देत जीवनाचे सकल आणि समग्र वास्तव दर्शन घडवणाऱ्या अनेक आंबेडकरी कवयित्री साठोत्तर मराठी काळात पुढे आल्या आपल्या पंखप्रतिभांनी त्यांनी अवघे मराठी कविताविश्व व्यापून टाकले.

**आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची प्रेरणा :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजक्रांतीने आजवर शोषित, उपेक्षित, दुर्लक्षित, वंचित असलेल्या अभावग्रस्त दलित जीवनात चैतन्य स्फुरले. डॉ. आंबेडकरांच्या क्रांतिप्रवण विचारांनी ह्या वर्गाला आत्मभान आले. साहित्याचे महत्त्व आंबेडकरांना माहित होते. म्हणूनच आंबेडकरांनी साहित्यिकांना उद्देशून, "मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचे आहे की उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये आपल्या साहित्यप्रकारातून अविष्कृत करा. आपलं लक्ष आकुंचित, मर्यादित ठेवू नका. ते विशाल बनवा! आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका तिचा विस्तार होऊ द्या आपल्या देशात उपेक्षिताचं, दलितांचं फार मोठे जग आहे हे विसरू नका. त्यांचचं दु:ख, त्यांची व्यथा नीट समजावून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचचं जीवन उन्नत करण्यास झटा. त्यातच मानवता आहे असे आवाहन केले."[३] साहित्याचा आणि मानवी जीवनाच्या उन्नयनाचा असा यथार्थ संबंध दर्शवून डॉ. आंबेडकरांनी अनेक प्रज्ञा—प्रतिभावंतांना आवाहन करून लिहिते केले. डॉ. आंबेडकर नावाच्या विद्यापीठातून शिकलेला आंबेडकरी नवतरूण —तरूणी स्वत:ची ओळख शोधू लागले. आणि ही ओळख त्यांना ती दलित —आंबेडकरवादी साहित्यात धम्मक्रांतिनंतर तर आंबेडकरवादी प्रतिभा उसळून आणि उफाळून आली, अधिक गतिमान झाली. यातून जशी आंबेडकरवादी कवींची पिढी समोर आली तशी आंबेडकरवादी कवयित्रींची पिढीही समोर आली. डॉ. आंबेडकरांच्या सम्यक विचारदर्शनातून आणि क्रांतदर्शी तत्त्वज्ञानातून प्रेरणा घेऊन आंबेडकरवादी कवयित्रींची कविता आपले नवे आणि स्वतंत्र अवकाश शोधू लागली. येथील पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेने आजपर्यंत स्त्रीला 'दास्य'त्वाच ठेवले होते डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांमुळेच आपल्याला 'माणूस' हे मूल्य प्राप्त झाले ही जाणीव आंबेडकरवादी कवयित्रींना झाली. म्हणूनच आंबेडकरवादी कवयित्री सुगंधा शेंडे लिहितात,

"कणकण पिऊनी तवतेजाचा
रोम रोम तेजाळून यावा
या तेजाच्या प्रज्वलतेने
विलया न्यावे भेदभावा"

विलयाला नेणारी भेदभावाची जाणीव सुगंधा शेंडेंच्या कवितेत अवतरली ती युगप्रवर्तक डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेनेच. डॉ. आंबेडकर ह्या युगपुरूषाच्या विचारांनी रोम रोम तेजाळून यावा आणि प्रकाशमान जगणे वाट्याला यावे ही जाणीव आंबेडकरवादी कवयित्रींना डॉ. आंबेडकरांमुळेच झाली.

आंबेडकरवादी कवयित्री हिरा बनसोडे त्यांच्या 'फिर्याद' या कविता संग्रहात लिहितात,

"क्रांतीची बिजली पेरली आहे
प्रत्येक घायाळ हृदयात
ही लढाई अटळ आहे ..... अटळ आहे"

अशी निर्णायक युद्धसंगराची गर्जना त्या करतात ते आंबेडकरी प्रेरणेमुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतदर्शी तत्त्वज्ञान आणि त्या तत्त्वज्ञानाच्या स्वीकारातूनच हिरा बनसोडेंची कविता प्रगल्भ आणि जाणिवसंपन्न झालेली दिसते. शोषण व्यवस्थेला तेजाबाने सबंध स्त्रीयांचे जगणे कसे भाजून गेले आहे याचे प्रत्ययकारी दु:ख आपल्या कवितेतून व्यक्त करताना आंबेडकरवादी कवयित्री कुमुद पावडे लिहितात,

"दारिद्र्य गोंदलेल्या त्यांच्या हिरव्या तर्रनसा
कुत्र्याची 'हाडहाड' भोगणारं जातीचं हिनपण
जन्मजात मृत्यूचं दु:ख सोसणारं असोशी स्त्रीपण
सारं कवेत घेऊन एकेक झोपडी
आक्रोश दावतांना कन्हत आहे.
पिढ्या न पिढ्या सखी हे असंच चालू आहे."

पिढ्या न पिढ्या आक्रोश दाबणारं दु:ख व्यक्त करण्याची प्रेरणा कवयित्रीला लाभली ती डॉ. आंबेडकरांमुळेच अस्तित्त्वभानाचा उजेड डॉ. आंबेडकरांनी ह्या देशातल्या स्त्रीच्या आयुष्यात पेरला नसता तर युगायुगाचे ठणकते दु:ख ती व्यक्त करू शकली नसती. हे सगळे घडते ते आंबेडकर या प्रेरणेमुळेच.

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची प्रेरणा आणखी ठळक करताना ज्योती लांजेवार या कवयित्रीचा आवर्जून विचार करावा लागतो. 'जिथे दीपज्योतींनी घरे अलंकारिली जातात जिथे गुढ्यातोरणांनी दारे श्रृंगारली जातात त्या देशात स्त्री अजून गुलाम आहे' ही दाहक जाणीव कवयित्रीला कुणामुळे होते? घर, पती आणि प्रियकराच्या आठवणींच्या पुढे न गेलेल्या मराठी कवितेतील पारंपरिक भावकविता लिहिणाऱ्या कवयित्रीपेक्षा 'आपण गुलाम आहोत' हे भान डॉ. आंबेडकरांमुळे आलेली आंबेडकरवादी कवयित्री डॉ. आंबेडकरांना आपली प्रेरणा मानताना पुढे लिहिते,

"बाबासाहेब,
आमच्या एकूलत्या एक आभाळाचा
तू चंद्र आहेस

ज्यांच्या आयुष्यालाच ग्रहण लागले
अशांचा तू सूर्य आहेस”

डॉ. आंबेडकरांप्रती श्रद्धा व्यक्त करणाऱ्या या ओळी म्हणजे डॉ. आंबेडकर हेच आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची प्रेरणा होत हे सूचित होते. आपल्या सबंध कवितांमधून विद्रोहाची रसरशीत उर्जस्वल जाणीव कवयित्री ज्योती लांजेवार यांना झाली ती डॉ. आंबेडकरांमूळेच हा प्रज्ञासूर्य जन्माला आला नसता तर आणखी हजारो शतके अंधाराच्या गुहेतच स्त्रीला काढावी लागली असती.

आंबेडकरवादी कवयित्री सुरेखा भगत लिहितात,

“दु:खितांचे आसू पुसण्याऐवजी
आसू येणेच थांबवले पाहिजे”

आता रडायचं नाही लढायचं ही जाणीव सुरेखा भगत यांच्या कवितेतून व्यक्त होते ती आंबेडकर या विचार प्रेरणेमुळेच प्रज्ञा लोखंडे अर्थात प्रज्ञा दया पवार या आंबेडकरवादी कवयित्रींमधील एक अत्यंत महत्त्वाच्या कवयित्री. ‘अंतस्थ’, ‘मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा’, ‘उत्कट जीवघेण्या धगीवर’ या कवितासंग्रहांतून आलेली त्यांची कविता पुरूषी व्यवस्थेला हादरे देते.

“तिने फाडून टाकलं
पुरू षी अधिसत्तेनं फडफडणारं
शब्दकोशाचं एकेक पान
तिने नाकारली
उतरंडीची
जन्मजात मिरासदारी”

ज्या पुरूषी व्यवस्थेने आपली मिरासदारी राबविण्यासाठी दैव, धर्म, नशीब, शास्त्रे यांच्या आकर्षक गुढ्या उभारल्या ते सर्व नाकारणारी जाणीव त्यांना होते ती आंबेडकरी तत्त्वज्ञानामूळेच ‘अंतस्थ’ मधील कवितेत त्या लिहितात,

“शंबूका,
मी वाट पाहतेय
इतिहासाच्या पानांवर
तू पेरून ठेवलेल्या
सुरूंगाच्या दाहक स्फोटाची”

शंबूकाची प्रतिमा प्रस्थापित मराठी कवितेतील कवयित्रींच्या कवितेत दिसत नाही. कारण त्यांच्या अनुभूतींचे आकाश वेगळे आहे. मात्र प्रज्ञा पवारांच्या कवितेत ही प्रतिमा अवतरते ती बाबासाहेबांमुळे इथल्या समाजव्यवस्थेने वळणांवळणांवर शंबुकांचा वध केला आहे. हा वध व्यर्थ जाऊ नये म्हणून वधाचे सुरूंग स्फोट झाले पाहिजे ही जाणीव आंबेडकरांनी दिलेल्या अस्तित्त्वभानामुळेच कवयित्रीला आलेली आहे.

प्रतिभा राजानंद या आंबेडकरवादी कवितेतील एक महत्त्वाच्या कवयित्री. ‘मला हवी असणारी पहाट’ या त्यांच्या कवितासंग्रहातून डॉ. आंबेडकर ह्या प्रेरणादायी सूर्याचा नवा आयाम व्यक्त होतो. त्या लिहितात,

“आपल्या भोंड्या हाताहातात अशोकाची रोपं
रोमारोमात बाबासाहेब रूजलेला अन्

पायापायात सावित्रीचं बळ."

प्रतिभा राजानंदांच्या या ओळी म्हणजे त्यांच्या कवित्त्वाची प्रेरणा डॉ. आंबेडकरच होत हे सिद्ध होते. रोमारोमात रूजलेला बाबासाहेब त्यांचा परिवर्तनवादी विचार त्यांचे क्रांतदर्शी तत्त्वज्ञान, उजेडाच्या दिशेने नेणारे त्यांचे दिशा दर्शक बोट म्हणजे कवयित्रीची प्रेरणाचा होय. सरला ठमके यांचा 'चित्कार' हा कवितासंग्रह म्हणजे आंबेडकरवादी जाणिवांच्या ठिणग्या आहेत. त्या लिहितात,

"मी लाथाडली संस्कृती
विद्येची देवी सरस्वती
माझी विद्या सावित्री"

'चित्कार' मधून अभिव्यक्त झालेली त्यांची ही जाणीव नव्या जीवनाचे स्वप्न रेखाटणारी आहे. पुरातन संस्कृतीचा दावा निखालस खोटा ठरवत 'माझी विद्या सावित्री' हे म्हणण्याचं भान त्यांना डॉ. आंबेडकर या युग पुरूषामुळेच आलेलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्या देशात जन्मले नसते तर या देशातील स्त्रीयांना आणखी हजारो शतके न्यायासाठी वाट पहावी लागली असती. संस्कृती लाथाडण्याचं धारिष्ट्य सरला ठमकेंना होते ते डॉ. आंबेडकर या युगप्रेरणेमुळेच आंबेडकरवादी कवयित्रींमधलं एक आश्वासक नाव म्हणजे ज्योत्सना चांदगुडे. आंबेडकरवादी कवयित्रींची प्रेरणा म्हणजे डॉ. आंबेडकर यांचचं अवघं जीवन होय. त्यातूनच ह्या कवयित्री लिहित्या झाल्यात. आपली स्वतंत्र ओळख शोधू लागल्या. ज्योत्सना चांदगुडे त्यांच्या एका कवितेत लिहितात,

"शेवाळलेल्या मन: पटलावर
आदळून हताश फिरत आहे, आसवांची
कहाणी पुसण्या नकोच दुर्गा नको पार्वती
लखलखत्या तलवारीची
मनामनातून उगवावी पाती"

विद्रोहाची अशी प्रगल्भ जाणीव चांदगुडेंच्या कवितेतून व्यक्त होते तेव्हा त्यामागे डॉ. आंबेडकरांच्या विद्रोही विचारांची प्रेरणा आहे, हे सिद्ध होते.

बाबासाहेबांमुळेच 'लख्ख उजेडाचे दिवस' वाट्याला आले हे सांगताना आशा थोरात लिहितात,

"लख्ख दिवस येईलसा पाहून आनंदी होतो
तोच खुडल्या जातात सकाळचे सूर्य रोज
सौंदर्याच्या बाजारात
आमच्याही हिरव्या शेतात पूर्वेकडे गुलाल उधळत असे
रात्री चंद्रोदय होत असे"

शोषणमूल्यांना नकार देत विद्रोह, वेदना, करूणा, सुंदर जगण्याचा आशावाद हे आंबेडकरवादी कवितेचे विशेष आहेत. आशा थोरात यांच्या कवितेमधून हे विशेष प्रामुख्याने नजरेत भरतात. स्त्री म्हणून येणाऱ्या सुंदर जगण्याचं अवकाश आपल्याला डॉ. आंबेडकरांमूळेच प्राप्त झालं म्हणूनच सौंदर्याच्या बाजारात खुडलं जाणारं स्त्रीत्व पाहून 'लख्ख दिवस येईल' ह्या आशावादाने त्यांचचं कवीमन आनंदी होतं.

डॉ. आंबेडकर हीच आपली काव्यनिर्मितीची प्रेरणा होय हे विशद करताना आशालता कांबळे लिहितात,

“ज्योती–सावित्रीने घडविलेली
मी एक आधुनिक स्त्री
बाबासाहेबांनी बहाल केलेल्या
बौद्ध तत्त्वज्ञानातील
‘स्त्रीत्त्वा’ला ओलांडून
माणूसपणाला साद घालणारी”

ज्योती सावित्रीने घडवलेली आणि माणूसपणाला साद घालणारी स्त्री आशालता कांबळेच्या कवितेत उभी राहते ती आंबेडकरी प्रेरणेमूळेच. सिसिलिया कार्व्हालो या आंबेडकरवादी कवितेतील एक महत्त्वाच्या कवयित्री आंबेडकरी प्रेरणेतून उभी राहिलेली त्यांची कविता आंबेडकरवादी कवितेत लक्षणीय म्हणावी अशी आहे. त्या लिहितात,

“चैत्यभूमीवर
खोपटा खोपटातून
एकेक मेणबत्ती उजळत येते
तेव्हा
पायाखालखा कणकण
किरण होऊन जातो
आणि त्या लख्ख झाडाबरोबर
माझे अस्तित्त्वही
उजळत जातो”

अस्तित्त्वाची प्रत्येक वाट आता उजळत जाणार आहे. कारण डॉ. आंबेडकर नावाचा सूर्य आता जीवनात आला आहे. हा सूर्यच स्त्रीच्या आयुष्यातला अनंतकाळाचा अंधार दूर सारणार आहे, ही उजेडाची जाणीव त्यांच्या कवितेत अवतरते ती डॉ. आंबेडकर यांच्यामुळेच. आपली काव्यप्रेरणा डॉ. आंबेडकर हे आहेत हे सांगताना प्रतिभा अहिरे म्हणतात,

“आमचे श्वास आभाळ होतात
भर उन्हात बहरलेल्या पळसाचं हसू
माझ्या सईच्या ओठांवर.....”

तर निलांबरी शिर्के आंबेडकर ह्या युगप्रेरणेबद्दल बोलताना लिहितात,

“स्त्री जातीच्या उद्धारास्तव
ज्योत अशीच तेवत ठेवू
काळ बदलला आम्हीही बदलू
ज्योत नव्हे मशाल होवू!”

आता इवलीशी ज्योत नव्हे तर साऱ्या समाजाला प्रकाशमान करणारी मशाल व्हायचे आहे, ही क्रांतीप्रेरणेची जाणीव त्यांच्या कवितेत येते ती निश्चितच डॉ. आंबेडकर ह्या प्रतिमेमूळे संध्या रंगारी हे आंबेडकरवादी कवयित्रींच्या वर्तुळातलं आणखी एक महत्त्वाचं नाव. ‘आघात’, ‘कवडसे’ या संग्रहातून वाचकांसमोर

आलेली त्यांची कविता चिंतनगर्भ, विचारशील, विद्रोही जाणिवा व्यक्त करते. त्यांच्याही कवितेतला विद्रोह हा आंबेडकरी प्रेरणेतूनच साक्षात झाला आहे.

"विवाह संस्थेवर विश्वास नाही माझा
कणाच मोडते ती बाईचा
कापून टाकते नखं
अन् शिंगसुद्धा
हक्काच्या घरात
आपण
पाळीव
पोसलेले"

ही क्रांतिगर्भ जाणीव संध्या रंगारींच्या कवीमनाला होते ती आंबेडकर ह्या युगप्रेरणेमुळेच.

"परंपरेचे नकाब चढवून
त्यांनी मला देवघरात बसवले
आणि हातात शस्त्र देताना मात्र
धार लावण्यास मनाई केली"

अशा अप्रतिम ओळी साकारणाऱ्या उषा अंभोरे किंवा 'ठार कोऱ्या वाळवंटी आयुष्यात/तुमच्या प्रज्ञेचा/एक किरण प्रवेशला/अन बाबा/त्या प्रकाशाने हजारो वर्षांचा अंधार तेजोमय झाला' या ओळी प्रसवणाऱ्या संजीवनी राजगुरू. ह्या मागील प्रेरणा आहे ती आंबेडकर विचार दर्शनाचीच.

"लागे भीम माळी/ओसाड भूमीला
हस्त स्पर्श झाली – सुजला सुफला
अज्ञानाच्या होती – प्रज्ञेचा नांगर
शीलाचा आसूड – जुन्या रूढीवरी"

या कवयित्री हिरा पवार यांच्या ओळी म्हणजे 'ओसाड भूमीला भीम माळी लाभला' त्यामुळेच अवघे जगणे सुजलाम सुफलाम झाले. अर्थातच हिरा पवार यांच्या या काव्यनिर्मितीची प्रेरणा डॉ. आंबेडकर ठरतात हे सांगणे न लये.

"शरीराच्या कोणत्या बिंदूपासून सुरू होतं
बाईचं बाईपण? / नेमक्या कुठल्या ग्रंथी
वितळतात निखालस वात्सल्याच्या विराट प्रवाहात"

अशी संपन्न स्त्रीवादी जाणीव अभिव्यक्त करणारी छाया कोरगावकर यांची कविता असो की, "यातनांची वारूळं अश्शी वाहताहेत सर्वांगाभोवती/बंड करून उठते आहे मी/पुन्हा पुन्हा तथागत शांततेसाठी" ही शारदा नवलेंची कविता किंवा 'मला न्हाऊन निघायचे आहे सूर्याच्या कोवळ्या प्रकाशात सूर्यफुल होण्यासाठी/सूर्याच्या तेजाने मला व्हायचे आहे प्रकाशाचे तारूण्य' ही भर्जरी आशयाभिव्यक्ती करणारी लता इंगळे यांची कविता म्हणजे नवा आंबेडकरवाद होय. शामल गरूड यांच्या 'या मेट्रो शहराच्या एका धुरकट गल्लीत/न्यूड चित्रासारखी ती फक्त डकवलेली' या ओळीतून किंवा 'जागतिक उदारीकरणाच्या अर्थव्यवस्थेत तुला केलंय sex worker/नि इथे तू मात्र ठराविक जातीची' या अभिनया रमेश या

कवयित्रींच्या ओळीतून अप्रत्यक्ष येणारे बाबासाहेबांचे संदर्भ म्हणजे गुलामीतून विद्रोह करत स्वयंप्रकाशाकडे येण्याचा नवा मार्ग वाटतो.

दीपा राजवर्धन, वर्षा मारूती भिसे या विसावं शतक संपताना लिहू लागलेल्या नव्या दमाच्या आंबेडकरवादी कवयित्री 'या शहरभर रूसलेत सगळे ऋतू/आकाश, पाणी, माती जगण्याचे सगळे संदर्भ/वेशीवर टाकलेत या शहराने' ही जाणीव व्यक्त करतात. वर्षा भिसेंची कविता असो की, 'धावली महिला शनीच्या मंदिरावर/तोडले धर्मग्रंथांचे मायाजाल तिने/ओतले तेल शनीवर महिलेने/पेटला सारा गाव धुतले दुधाने शनीला/काय ही व्यवस्था, धार्मिक संस्कृतीत गावच झोपला' ही दीपा राजवर्धने यांची नवे संदर्भ चिन्हांकित करणारी कविता म्हणजे आंबेडकरी प्रेरणेतून पेटलेला पलिताच आहे.

आदिवासी जीवनजाणिवा घेऊन लिहिती झालेल्या उषाकिरण आत्राम यांचा समावेश आदिवासी कवयित्रींमध्ये होत असला तरी त्यांच्या लिखानामागची आदि प्रेरणा डॉ. आंबेडकर आणि त्यांचा क्रांतिगर्भ विचार हेच होय हे लक्षात येते.

"मक्तेदारी चालणार नाही!
ब्राम्हणशाही चालणार नाही!
आम्ही नाहीत हिंदू!
आम्ही आहोत कोयतूर
आमचा प्रकाश आम्हीच होवू"

'अत्तदिप हो तू स्वयंदीप हो' ही युगप्रेरणा मनात ठसवून कवयित्री आता 'आमचा प्रकाश आम्हीच होऊ' असे म्हणते तेव्हा त्यामागची प्रेरणा डॉ. आंबेडकर होत हेच सिद्ध होते.

आदिवासी कवितेतलं आणखी एक महत्त्वाचं नाव म्हणजे कुसुम अलाम. त्यांच्या कवितेची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हीच आहे हे सांगताना त्या लिहितात,

"खरं सांगू आई
मला जमलेच नाही पाषाणाला शेंदूर फासणे"
आणि म्हणूनच "अस्मितेच्या रक्षणासाठी मनुवाद्यांना प्रखर विरोध करावा"

ही विद्रोही मांडणी करणाऱ्या कुसुम अलामांची काव्यप्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत हे लक्षात येते.

प्रस्तुत 'आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची प्रेरणा' या शोधनिबंधातील वरील विवेचनाचा विचार करताना असे म्हणता येते की, आंबेडकरवादी कवयित्रींच्या पहिल्या पिढीतील कवयित्री आणि आता लिहू लागलेल्या दुसऱ्या पिढीतील कवयित्रींच्या कवितेची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच होत हे लक्षात येते. या सर्व कवयित्रींचा उर्जास्त्रोत यशोधरा, जिजाऊ, सावित्री, रमाई, ताराबाई, वीरांगणा राणी दुर्गावती असल्या तरी त्यांच्या कवितेची आदिप्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत हे या कवयित्रींच्या अभिव्यक्तीतून सप्रमाण सिद्ध होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिगर्भ विचारांनी आंबेडकरवादी कवयित्रींच्या मनोभूमीचे सिंचन झाले आहे. प्रस्तुत शोधनिबंधातील उल्लेखित या व अशा कितीतरी आंबेडकरवादी कवयित्रींनी आंबेडकरवादी कविता जिवंत, रसरशीत, समृद्ध, विचारगर्भ, चैतन्यमयी व गतिमान करण्याचे कार्य केले आहे.

**निष्कर्ष :—**

१. आंबेडकरवादी कवयित्रींनी आंबेडकरवादी कविता अधिक समृद्ध, तेजोमय व लखलखीत केली आहे.

२. डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतून परिवर्तनासाठी घेतलेला वसा हे आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेचे स्वरूप आहे.

३. आंबेडकरवादी कवयित्रींची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे युगदर्शी व्यक्तिमत्त्व होय. त्याची प्रचिती या कवयित्रींच्या कवितेतून येते.

४. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेचे अवकाश हे स्वतंत्र आणि उजेडाच्या प्रार्थना करत नव्या स्त्रीजीवनाची पहाट रेखाटणारे आहे.

५. आंबेडकरवादी कवयित्रींची कविता एकसूरी, कंठाळी, उरबडवी नाही; तर ती नव्या जीवनाचे उर्जस्वल स्वप्न रेखाटणारी कविता आहे. जिवंत, रसरशीत चैतन्याने भारलेली आंबेडकरवादी कवयित्रींची कविता एकूणच मराठी कवितेतील आशयअभिव्यक्तीचे लखलखीत पान आहे.

**संदर्भ सूची :—**


१. यशवंत मनोहर, आंबेडकरवादी मराठी साहित्य, भीमरत्न प्रकाशन, नागपूर, १९९९, पृ. ११२

२. यशवंत मनोहर, आंबेडकरवादी मराठी साहित्य, भीमरत्न प्रकाशन, नागपूर, १९९९ पृ. ६३

३. यशवंत मनोहरांच्या 'आंबेडकरवादी मराठी साहित्य' या पुस्तकातून उद्धृत, पृ. ६३